# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/११/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०१/११/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोस्टे अरोली हद्दीत मौदा कोदामेंढी शिवार येथे काही लोक ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे अरोली हद्दीत मौदा कोदामेंढी शिवार येथे जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे— १) चंद्रशेखर मनोहर जुमळे, वय ४० वर्ष, रा. अरोली ता.मौदा २) भिमराव सुदाम झलके वय ६० वर्ष, रा. अरोली ता.मौदा ३) सिध्दार्थ चिरकुट माटे वय ५६ वर्ष, रा. बेरडेपार ता.मौदा ४) निलेश टेकचंद देवतडे य ३२ वर्ष रा. कोदामेंढी ता मौदा ५) रोशन माणिकचंद मोहणे वय ३६ वर्ष रा कोदामेंढी तह. मौदा ६) पळुन जाणारा राहुल वाघाडे रा. कोदामेंढी** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन अंगझडतीमध्ये व डावावर नगदी रूपये १०,१५०/— रूपये व दोन कॅट ५२ तास पत्ते प्रत्येकी कि. ५० रू प्रमाणे १००/— रूपये व तिन मोबाईल कि. ४१,०००/—रू. तसेच दोन मोटार सायकल कि. ७०,०००/—रूपये, असा एकुन १,२१,२५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूद्ध पोस्टे अरोली येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## पो.स्टे. कन्हान हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

पोस्टे कन्हान अंतर्गत दिनांक ०१/११/२०२४ चे ००.१५ वा. ते ०१.०५ वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे आदेशाने पोस्टे कन्हान येथील स्टाफ पो. स्टे. कन्हान परीसरात कोंबींग ऑपरेशन व अवैध धंद्यांवर रेड करणे करीता पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे माहिती मिळाली कि, फोकट नगर कांद्री येथील शितला माता मंदीर जवळ काही ईसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळत आहे. अशी माहिती मिळाल्याने सदर जुगारी इसमांवर रेड केली असता जुगार खेळणारे **आरोपी नामे— १) अभि उर्फ आशिक रत्नाकर नागपुरे वय २२ वर्षे रा. बोडा ता. पारशिवनी, २) शिवनंदन नवरंग सिंग वय ३३ वर्षे रा. कांद्री ता. पारशिवनी व फरार आरोपी नामे ३) फारुख अब्दुला शेख रा. फुकट नगर कांद्री ता. पारशिवनी, ४) आमीन सैय्यद शेख रा. फुकट नगर, कांद्री व ईतर आरोपी** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन नगदी ८५०/— रु. तसेच सदर जुआरी इसम जुगार खेळत असलेल्या ठिकाणी वरुन ५२ तासपत्ते, आरोपी अभि उर्फ आशिक नागपुरे याची मोटार सायकल क्र. एम. एच.—३१/सी.डब्लु.—८३५५ किंमती ८०,०००/— रु. व स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एम. एच. ४० सी. पी. ३३३१ किमती ७०,०००/— रु. ची असा एकुण १,५०,८५०/— रु. चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर